# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


**परिपत्रक/महत्वाचे**

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१८/ 82

दिनांक :- 4 JAN 2018

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद/

शासकीय तंत्रनिकेतने, औरंगाबाद/जालना/अंबड/बीड/उस्मानाबाद/

पु.ला.लातुर/शा.नि.म.तं.नि.लातुर/नांदेड/हिंगोली/जिंतुर

**औरंगाबाद विभाग**

**विषय :- तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध शासकीय/स्वायत्त संस्थांचे इमारत बांधकामाचे प्रस्ताव तपासण्यासाठी संस्थांची बांधकाम समिती गठीत करणेबाबत.**

संदर्भ :- शासन परिपत्रक क्र.बांनिधी-१२१७/प्र.क्र.१४२/२०१७/तांशि-३, मुंबई दिनांक २५ सप्टेंबर, २०१४

या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेल्या शासकीय पदविका/पदवी अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्था प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, संस्थांमध्यील सुरू असलेल्या बांधकामासाठी तसेच प्रशासकीय मान्यता दिलेल्या तथापि अद्याप काम सुरू न केलेल्या तसेच प्रस्तावित करण्यात येणा-या बांधकामाचे नियोजन करण्यासाठी प्रत्येक संस्थेने विविध बांधकामासाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १ | विभागीय तंत्रशिक्षण सहसंचालक | अध्यक्ष |
| २ | संबंधित संस्थेचे प्राचार्य | सदस्य |
| ३ | संबंधित संस्थेच्या स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख/प्राध्यापक | सदस्य सचिव |

या सोबत सदरील परिपत्रकाची प्रत आपल्या आवश्यक कार्यवाहीसाठी जोडण्यात येत आहे.बांधकामाचे प्रस्ताव तपासण्यासाठी कार्यपध्दती संदर्भिय शासन परिपत्रकात नमुद केली आह त्या नुसार कार्यवाही करण्यात यावी.

सोबत :- वरील प्रमाणे

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध शासकीय/स्वायत्त संस्थांचे इमारत बांधकामाचे प्रस्ताव तपासण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
परिपत्रक क्रमांक: बांनिधी-१२१७/प्र.क्र.१४२ /२०१७/तांशि-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २५ सप्टेंबर, २०१७.

परिपत्रक :- तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली विविध शासकीय/ स्वायत्त संस्थांमधील सुरु असलेल्या बांधकासाठी तसेच प्रशासकीय मान्यता दिलेल्या तथापि अद्याप काम सुरु न केलेल्या विविध बांधकासाठी सद्याची एकूण मागणी रु.१६७.४१ कोटी इतकी आहे. या व्यतिरिक्त अनेक संस्थांचे नवीन बांधकामाचे प्रस्ताव प्राप्त होत आहेत. हा खर्च टप्प्याटप्प्याने करावा लागणार असला तरी अपुऱ्या निधीच्या अभावी बांधकामाच्या सर्व प्रस्तावांचे योग्य ते नियोजन करणे आवश्यक आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त होणाऱ्या नकाशे व अंदाजपत्रकाची संस्था स्तरावर छाननी आवश्यक आहे. यास्तव, तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध शासकीय/ स्वायत्त संस्थांकडून प्रशासकीय मान्यतेसाठी प्राप्त होणाऱ्या बांधकामांच्या सर्व प्रस्तावांची छाननी करण्याकरिता खालील प्रमाणे प्रत्येक विभागामध्ये एक समिती गठीत करण्यात येत आहे. :-

| | | |
|---|---|---|
| १ | विभागीय तंत्रशिक्षण सह-संचालक | अध्यक्ष |
| २ | संबंधित संस्थेचें प्राचार्य | सदस्य |
| ३ | संबंधित संस्थेच्या स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख/प्राध्यापक | सदस्य सचिव |

२. बांधकामाचे प्रस्ताव तपासण्यासाठी कार्यपध्दती पुढीलप्रमाणे राहील.

१) प्रत्येक संस्था रु.१.०० कोटी व त्यापेक्षा जास्त रकमांचे बांधकामाचे प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त नकाशे व अंदाजपत्रक यासह सदर समितीसमोर ठेवतील.

२) संस्थेकडून प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर समिती आवश्यकतेनुसार संस्थेस भेट देऊन जागेची व उपलब्ध इमारतींची पहाणी करेल.

३) सार्वजनिक बांधकामाकडून प्राप्त नकाशे व अंदाजपत्रके याची छाननी करुन त्यामध्ये काही सुधारणा आवश्यक असल्यास त्या सुधारणा करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास अवगत करेल.

४) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार संस्थेस आवश्यक असलेल्या बांधकाम क्षेत्रफळाची निश्चिती करुन विचाराधीन प्रस्तावाची माहिती सोबत प्रपत्रामध्ये भरुन त्याबाबत योग्य ती शिफारस करेल.

५) त्यानंतर हा प्रस्ताव तंत्रशिक्षण संचालकांकडे पाठविण्यात येईल.

६) तंत्र शिक्षण संचालक त्यांच्या शिफारसीसह हा प्रस्ताव शासनाकडे सादर करतील.

७) समितीच्या कामकाजासाठी समितीच्या अध्यक्षांना योग्य वाटेल अशा तज्ञ व्यक्तिस नियुक्त करण्याचे अधिकार असतील.

८) बांधकामाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावांना देखील हीच कार्यपध्दती लागू राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सहसंचालक, तंत्रशिक्षण,
वि.का. औरंगाबाद
आवक क्र. 11384
दिनांक 28 DEC 2017

(संजय औ. धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) तंत्र शिक्षण विभागीय कार्या. औरंगाबाद

## तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध शासकीय / स्वायत्त संस्थांचे इमारत बांधकामाचे प्रस्ताव तपासण्यासाठी नियुक्त समितीचा तपासणी अहवाल

<table>
<tr><td>१</td><td>संस्थेचे नाव</td><td></td></tr>
<tr><td>२</td><td>उपलब्ध जागेचे क्षेत्रफळ</td><td>हेक्टर / एकर</td></tr>
<tr><td>३</td><td>प्रवेश क्षमता</td><td><table><tr><td>वर्ष</td><td></td></tr><tr><td>विद्यार्थी</td><td></td></tr><tr><td>विद्यार्थीनी</td><td></td></tr><tr><td>एकूण</td><td></td></tr></table></td></tr>
<tr><td>४</td><td>अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या निकषानुसार आवश्यक किमान बांधकामाचे क्षेत्रफळ</td><td>चौ. मी. / चौ. फूट</td></tr>
<tr><td>५</td><td>अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या निकषानुसार कमतरता असलेल्या बांधकामाचे क्षेत्रफळ</td><td>चौ. मी. / चौ. फूट</td></tr>
<tr><td>६</td><td>संस्थेमध्ये असलेल्या एकूण इमारतींची संख्या व क्षेत्रफळ</td><td><table><tr><td>इमारत क्र.</td><td>इमारतीचे नाव</td><td>क्षेत्रफळ चौ.मी./चौ.फूट</td></tr><tr><td></td><td></td><td></td></tr><tr><td></td><td></td><td></td></tr><tr><td>एकूण</td><td></td><td></td></tr></table></td></tr>
<tr><td>७</td><td>आता प्रस्तावित बांधकामाची कारणे व तपशिल</td><td></td></tr>
<tr><td>८</td><td>प्रस्तावित बांधकामाचे क्षेत्रफळ</td><td>चौ. मी. / चौ. फूट</td></tr>
<tr><td>९</td><td>प्रस्तावित बांधकामाचे अंदाजित आयुष्य</td><td></td></tr>
<tr><td>१०</td><td>जिल्हा दरसूची वर्ष</td><td></td></tr>
<tr><td>११</td><td>अंदाजपत्रकातील कामाची किंमत</td><td></td></tr>
<tr><td>१२</td><td>या कामास प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर प्रत्येक वर्षाच्या खर्चाचे नियोजन</td><td>(रुपये लाखात)<table><tr><td>वर्ष</td><td>आवश्यक तरतूद</td></tr><tr><td></td><td></td></tr><tr><td></td><td></td></tr><tr><td>एकूण</td><td></td></tr></table></td></tr>
<tr><td>१३</td><td>समितीचे अभिप्राय व शिफारस</td><td></td></tr>
</table>